# अंतर्गत सुरक्षा

राष्ट्रीय सुरक्षेकडे बघण्याचा पारंपरिक दृष्टिकोन बहुधा सैनिकी सामर्थ्यापुरता मर्यादित राहतो. देशाच्या सीमांचे रक्षण करणे, याच्या पलीकडे त्याची सहसा मजल जात नाही. मात्र, १९७० च्या दशकातील जागतिक तेलसंकटाने अनेक देशांच्या या पारंपरिक समजुतीला मोठा धक्का दिला. त्यातून सध्याचे जग हे आता परस्परांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून असल्याची प्रकर्षाने जाणीव झाली. तसेच, विकसित देशही अनेक प्रकारच्या साधनसंपत्तीसाठी विकसनशील देशांवर अवलंबून असतात, हेही सर्वांना कळून चुकले. विविध देश परस्परांवर अवलंबून असणाऱ्या या जगात आर्थिक सुरक्षेची कल्पना त्यामुळेच महत्वाची ठरते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**१९७३ चे तेलसंकट :** ऑर्गनायझेशन ऑफ अरब पेट्रोलियम एक्स्पोर्टिंग कंट्रीज (OAPEC) या संघटनेत ऑईल प्रोड्युसिंग अँड एक्स्पोर्टिंग कंट्रीजमधील (तेल उत्पादक देशांची संघटना – OPEC) अरब देशांव्यतिरिक्त इजिप्त आणि सिरियाचाही यात समावेश आहे. इस्राईलच्या सिरिया आणि इजिप्तशी झालेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इस्राईलला पाठिंबा देणाऱ्या देशांना आपण खनिज तेल देणार नाही, अशी भूमिका या संघटनेने घेतली. त्यामुळे अमेरिकेसह पश्चिम युरोपमधील देशांच्या खनिज तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम झाला. त्याचबरोबर तेलउत्पादक देशांच्या संघटनेने खनिज तेलाच्या किमतीतही वाढ केली. या हालचालींचा जागतिक अर्थव्यवस्थेवर घातक परिणाम झाला. त्याला '१९७३ चे तेलसंकट' असे संबोधले जाते.

सोव्हिएत रशियाचे १९९१मध्ये विघटन झाल्यानेही राष्ट्रीय सुरक्षेसंबंधीच्या कल्पनांमध्ये मोठे बदल झाले. सुरक्षेच्या पारंपरिक संकल्पनेत राज्याच्या भूमिकेला मोठे महत्त्व आहे. मात्र, आता हा केंद्रबिंदू राज्यसंस्थेकडून जनतेकडे सरकला आहे. सर्वंकष सुरक्षा (कॉम्प्रिहेन्सिव्ह सिक्युरिटी) ही संकल्पना आता प्राधान्याने मांडण्यात येत आहे. या संकल्पनेत राज्यसंस्थेच्या सुरक्षाविषयक गरजा आणि जनतेच्या सुरक्षाविषयक गरजा यांची सांगड घालण्याचा प्रयत्न होत आहे. सर्वसामान्य जनता आणि समाजावर सुरक्षेचा मोठा परिणाम होत असल्याने त्याकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहता यावे, या हेतूने सर्वंकष सुरक्षा ही संकल्पना मांडण्यात येत आहे. या संकल्पनेत पुढील विषयांचा गांभीर्याने विचार करण्यात येतो :

(i) **पर्यावरण सुरक्षा :** पर्यावरणाशी संबंधित अनेक बाबींचा यात समावेश होतो. उदाहरणार्थ, ऊर्जाविषयक समस्या, लोकसंख्यावाढीचे परिणाम, अन्नधान्य निर्मितीच्या समस्या, परिसंस्थेत होणारे बदल, दीर्घकाळ चालू न शकणाऱ्या उत्पादनव्यवस्थेमुळे होणारे आर्थिक परिणाम, पर्यावरणाचा नागरी जीवनावर होणारा परिणाम इत्यादी.

(ii) **आर्थिक सुरक्षा :** राज्यसंस्थेच्या सामर्थ्याचा एक घटक म्हणून आर्थिक प्रगती साधण्यावर आर्थिक सुरक्षेचा भर असतो. आर्थिक साधनसंपत्ती आणि त्यांच्या पुरवठ्याचे संरक्षण हा आर्थिक सुरक्षेचा महत्वाचा भाग आहे.

(iii) **समाजाची सुरक्षा (सोसायटल सिक्युरिटी) :** स्थलांतरितांचे प्रश्न, सामाजिक व वांशिक विच्छेदनाचे प्रयत्न, विविध सामाजिक गटांमध्ये आर्थिक स्पर्धा आणि त्यातून उद्‌भवू शकणारे सामाजिक संघर्ष आदी बाबींचा समाजाच्या सुरक्षिततेत समावेश होतो.

(iv) **राजकीय सुरक्षा :** राज्यसंस्थेच्या अस्तित्वाला असलेल्या अंतर्गत सुरक्षा धोक्यांचा यात प्रामुख्याने समावेश होतो. त्यात बंडखोरी, हिंसक कारवाया, दहशतवाद आदींचा समावेश होतो.

यासंबंधीची चर्चा आता व्यापक प्रमाणात घडत असून, मानवी सुरक्षा हा शब्दप्रयोगही त्यासंदर्भात वापरला जाऊ लागला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवी विकास अहवालातही सुरक्षेसंबंधी या नव्या विचारांचे प्रतिबिंब आता उमटत आहे. उदाहरणार्थ, १९९४च्या मानवी विकास अहवालात मानवी सुरक्षेसंबंधी दोन घटकांचा उल्लेख केला आहे. मानवी हक्क रक्षणाच्या वैश्विक जाहीरनाम्यातही त्यांचा उल्लेख आहे. हे घटक म्हणजेः भयापासून मुक्ती आणि गरजांपासून मुक्ती. १९९४च्या अहवालात मानवी सुरक्षेचे इतर सात पैलूही नमूद केले आहेत. ते याप्रमाणेः आर्थिक, अन्नधान्य, आरोग्य, पर्यावरण, वैयक्तिक, समुदाय आणि राजकीय. मानवी सुरक्षा संकल्पनेचा केंद्रबिंदू लोक (जनता) आहे. त्यामुळे या संकल्पनेला देशोदेशींच्या सीमांचेही त्या अर्थाने बंधन नाही. त्यांचा भर मानवी मूल्ये, व्यक्तींच्या प्रतिष्ठेचे रक्षण, सामाजिक न्याय, स्वातंत्र्य आणि समानता आदींवर आहे. या कल्पना आता भविष्यातल्या बहुदेशीय जागतिक व्यवस्थेच्या भाग बनल्या आहेत. ह्या बदलत्या संदर्भात अंतर्गत सुरक्षिततेच्या संकल्पनेचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

### अंतर्गत सुरक्षा

अंतर्गत सुरक्षा ही राष्ट्रीय सुरक्षेच्या पारंपरिक कल्पनेपेक्षा वेगळी आहे, ही बाब आता स्पष्ट झाली आहे. तिचा भर लोकांवर परिणाम करणाऱ्या राजकीय, आर्थिक आणि सामाजिक-सांस्कृतिक पैलूंशी आहे. विविध देशांची सरकारे, कायदा अंमलबजावणीच्या यंत्रणा आणि सुरक्षा यंत्रणाही आता हीच परिभाषा वापरत आहेत. केवळ देशांच्या सीमांचे संरक्षण याच्या पलीकडे जाऊन विविध गोष्टींचा साकल्याने विचार करणारी ही संकल्पना आहे. त्यात महापूर, वादळ, भूकंपासारख्या नैसर्गिक आपत्तींत लोकांचे संरक्षण करण्यापासून ते मादक पदार्थांची तस्करी, सायबर क्राईम, स्थलांतरितांचे प्रश्न यांसारख्या मानवनिर्मित समस्यांचाही समावेश होतो. त्यात पोलिस, निमलष्करी दले, सशस्त्र सेनादले यांच्या जोडीला स्थलांतर व सीमाशुल्कसंबंधित खाती, अग्निशमन दल आणि नागरी संघटनांचाही (सिव्हिल सोसायटी) समस्या निवारणासाठी/सुरक्षा कार्यासाठी एकत्रितरीत्या समन्वयाने उपयोग करण्याचा समावेश होतो.

अंतर्गत सुरक्षा हा शब्दप्रयोग १९८० आणि १९९० च्या दशकांमध्ये प्रामुख्याने प्रचलित झाला, तरी ही संकल्पना राष्ट्र-राज्य संकल्पनेइतकीच जुनी आहे. भारतीय संदर्भातही सुरक्षा या विषयाचे अनेक पैलू विचारात घेण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, त्यासाठी संस्कृतमध्ये अनेक शब्द आहेत. रक्षः, रक्षणम्, रक्षकः असे शब्द 'रक्ष' या मूळ धातूपासून तयार झाले आहेत. रक्षचा अर्थ संरक्षण करणे, बचाव करणे, लक्ष ठेवणे असा आहे. तसेच, सुरक्षा हा शब्दही सर्व प्रकारच्या संरक्षणासाठी वापरला जातो. तसेच, अभयम् हा शब्द निर्भीड असणे, भयापासून मुक्त व सुरक्षित असणे यासाठी वापरला जातो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रातही सुरक्षेचे अंतर्गत आणि बाह्य संरक्षण असे दोन पैलू सांगितले आहेत. अंतर्गत सुरक्षा नीट राखण्यासाठी 'दंडनीती' सांगितली आहे. कायदा सुव्यवस्था नीट राखणे आणि देशाच्या संपत्तीचे संरक्षण, संवर्धन व देखभाल करणे ही राजाची मूलभूत कर्तव्ये सांगितली आहेत.

संयुक्त राष्ट्राने २००४ मध्ये सध्याच्या काळातील बदल, धोके आणि आव्हाने यांच्या अभ्यासासाठी उच्चस्तरीय गट (यूएन हाय लेव्हल पॅनेल ऑन थ्रेट्स, चॅलेंजेस् अँड चेंज) स्थापन केला होता. सध्याच्या काळातील धोक्यांना राष्ट्रीय सीमांचे कोणतेही बंधन नाही, ते एकमेकांशी जोडलेले आहेत आणि त्यांचा सामना राष्ट्रीय, प्रादेशिक व जागतिक पातळीवर एकत्र येऊनच केला पाहिजे, असे प्रतिपादन या गटाने केले होते. या गटाने धोक्यांची सहा प्रकारांमध्ये वर्गवारी केली आहे, ती पुढीलप्रमाणेः

- आर्थिक आणि सामाजिक धोके. यात गरीबी, संसर्गजन्य रोगांचा प्रसार, पर्यावरणाची हानी, आदी बाबींचा समावेश आहे.
- आंतरराज्य संघर्ष
- अंतर्गत संघर्ष. यात यादवी युद्ध, वंशविच्छेदाचे प्रयत्न आणि मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या

अत्याचाराच्या इतर घटनांचा समावेश आहे.

- आण्विक, किरणोत्सारी, रासायनिक आणि जैविक अस्त्रांचा वापर
- दहशतवाद
- आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी

भारतातही राष्ट्रीय सुरक्षेसंबंधी स्थापन करण्यात आलेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या एका मंत्रिगटाने दिलेल्या अहवालाद्वारे (२००१) अंतर्गत सुरक्षेसंबंधी पुढील गोष्टींकडे देशाचे लक्ष वेधले आहे.

- पूर्वोत्तर राज्यांमधील विप्लव (इन्सर्जन्सी)
- पंजाबमधील काही खलिस्तानवादी घटकांना पाकिस्तानकडून मिळणारी मदत व पाठिंबा
- पाकिस्तानच्या इंटरसर्व्हिसेस इंटेलिजन्स (आयएसआय) या संघटनेच्या भारतातील कारवाया आणि इस्लामी मूलतत्त्ववादाचा धोका
- शस्त्रास्त्रे आणि मादक पदार्थांची चोरटी वाहतूक आणि त्यांच्यातील परस्परसंबंध
- खोट्या चलनी नोटा बाजारात आणणे आणि अवैध मार्गाने पैशांचे हस्तांतर करणे
- बांगलादेशातून होणारे बेकायदेशीर स्थलांतर
- जातीय, जमातवादी आणि पांथिक हिंसाचार
- कडव्या डाव्या विचारसरणीच्या (माओवादी) चळवळी

केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अंतर्गत सुरक्षा विभागाकडे देशाची अंतर्गत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी आहे. त्यात विविध दहशतवादी संघटना व गटांच्या देशविरोधी आणि घातपाती कारवाया रोखणे, दहशतवाद्यांना होणारा वित्तपुरवठा रोखणे, दहशतवादविरोधी कारवाईत सुस्पष्टता येण्यासाठी धोरणे ठरवणे, आयएसआयच्या हालचालींवर लक्ष ठेवणे, विविध सुरक्षा परवाने वितरित करणे आणि दहशतवादविरोधी मोहिमेसाठी पाकिस्तानशी गृहसचिव पातळीवर चर्चांचे आयोजन करणे आदी गोष्टींचा समावेश होतो. केंद्रीय गृहमंत्रालयाच्या २०१७-१८ च्या वार्षिक अहवालात अंतर्गत सुरक्षेसंबंधी पुढील गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास सुचवले आहे.

(i) देशाच्या अंतर्गत भागात होणारे दहशतवादी हल्ले

(ii) जम्मू-काश्मीरमध्ये सीमेपलीकडून घडवले जाणारे दहशतवादी हल्ले (क्रॉसबॉर्डर टेररिझम)

(iii) पूर्वोत्तर राज्यांमधील विप्लव समस्या

(iv) देशाच्या काही भागात कडव्या डाव्या विचारसरणीच्या (माओवादी) संघटनांकडून होणाऱ्या हिंसक कारवाया

या प्रकरणात भारताच्या अंतर्गत सुरक्षेला असलेल्या वरील चार प्रमुख धोक्यांचा आपण विचार करू.

**अंतर्गत सुरक्षेच्या संदर्भात भारताला करावे लागलेले संघर्ष**

| अ.क्र. | संघर्ष | कालावधी | वर्ष |
|---|---|---|---|
| १. | नागालँड | ऑगस्ट १९४७ ते आजपर्यंत | ७२ वर्षांहून अधिक काळ |
| २. | मणिपूर | १९६४ ते आजपर्यंत | ५५ वर्षांहून अधिक काळ |
| ३. | मिझोराम | १९६६-८८ | २२ वर्षे |
| ४. | मेघालय | १९८८ ते आजपर्यंत | ३१ वर्षांहून अधिक काळ |
| ५. | त्रिपुरा | १९६५ ते आजपर्यंत | ५४ वर्षांहून अधिक काळ |
| ६. | आसाम | १९७९ ते आजपर्यंत | ४० वर्षांहून अधिक काळ |
| ७. | पंजाब | १९७८ ते १९९३ | १६ वर्षे |
| ८. | जम्मू-काश्मीर | १९८८ ते आजपर्यंत | ३१ वर्षांहून अधिक काळ |
| ९. | डाव्या विचारसरणीचा हिंसाचार नक्षलवाद/माओवाद | १९६७ ते आजपर्यंत | ५२ वर्षांहून अधिक काळ |

## दहशतवाद

समाजात दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने घडवून आणलेला हिंसाचार म्हणजे दहशतवाद असे सामान्यपणे समजले जाते. त्याबाबत आणखी स्पष्टता येण्यासाठी अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने केलेली दहशतवादाची व्याख्या आपण पाहू. 'भूमिगत पद्धतीने काम करणाऱ्या संघटना किंवा वेगळी राष्ट्रीय अस्मिता जोपासणाऱ्या (सबनॅशनल) गटांनी समाजात मोठ्या प्रमाणावर प्रभाव (दहशत) निर्माण व्हावा या उद्देशाने सर्वसामान्य किंवा सैनिकेतर लक्ष्यांविरुद्ध घडवून आणलेला पूर्वनियोजित व राजकीय हेतूंनी प्रेरित हिंसाचार म्हणजे दहशतवाद' असे त्यात म्हटले आहे. बाह्यतः ही गनिमी काव्याच्या पद्धतीने चाललेली लढाई वाटू शकते. परंतु, गनिमी काव्याच्या युद्धाप्रमाणे एखाद्या विशिष्ट भूप्रदेशावर नियंत्रण मिळवण्याच्या हेतूपुरत्या दहशतवादी कारवाया मर्यादित नसतात. त्याला विषम किंवा असमान युद्ध (असिमेट्रिक वॉरफेअर) असेही म्हटले जाते. याचे कारणही सहसा विषम सैनिकी सामर्थ्य असलेल्या दोन बाजूंमधली लढाई असते आणि हिंसाचार कधी, कुठे व कसा घडवला जाईल, याची कोणतीही खात्री नसते. ज्या निरपराध व्यक्ती वा समूहांकडे स्वतःचे संरक्षण करण्याची शक्ती नसते, अशांना लक्ष्य बनवून समाजात मोठ्या प्रमाणावर भयाचे किंवा दहशतीचे वातावरण तयार करण्याचा दहशतवाद्यांचा उद्देश असतो. अशा लक्ष्यांना 'सॉफ्ट टार्गेट्स' किंवा 'मृदू लक्ष्य' म्हटले जाते. सामान्य नागरिकांच्या प्रवासाची साधने असलेल्या बस व रेल्वेगाड्या, बस वा रेल्वेस्थानके, सिनेमागृहे, बाजारपेठा, मॉल अशी गर्दीची ठिकाणे दहशतवादी हल्ल्यांसाठी निवडतात. अशा हल्ल्यांमागे त्यांचा निश्चित असा राजकीय किंवा वैचारिक उद्देश असतो.

दहशतवादाची समस्या जगाला मोठ्या प्रमाणावर आता भेडसावत असली, तरी दहशतवाद हा शब्दप्रयोग प्रथम फ्रान्समधील १७९३-९४ च्या 'रेन ऑफ टेरर'च्या (दहशतीचे साम्राज्य) संदर्भात प्रथम वापरण्यात आला. फ्रान्समधील ऐतिहासिक राज्यक्रांतीचे नेतृत्व करणाऱ्यांनी क्रांतिकारी शक्तींमधील गद्दार किंवा क्रांतिद्रोही व्यक्ती-प्रवृत्तींना उखडून टाकण्यासाठी हिंसाचाराचा वापर केला. स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी दहशत उत्पन्न करणे हाच उत्तम उपाय असल्याचे समर्थन त्यांनी केले. मात्र, फ्रेंच राज्यक्रांती जसजशी पुढे गेली, तसा हा शब्द राज्यसंस्थेने घडवलेल्या हिंसाचाराशी (स्टेट व्हायोलन्स) आणि गिलोटिनच्या साह्याने क्रांतिकारी नेत्यांना मृत्यूदंड देण्याच्या घटनांशी जोडला गेला.

आधुनिक काळातील दहशतवादाचा आपण विचार करतो, तेव्हा १९७२ च्या म्युनिच ऑलिंपिकमध्ये इस्रायली खेळाडूंचे करण्यात आलेले अपहरण व हत्येच्या घटनेकडे निर्देश केला जातो. त्यानंतर जगभरात विविध ठिकाणी दहशतवादाच्या अनेक घटना घडल्या आहेत.

दहशतवादी अनेकदा एखादी अमूर्त विचारसरणी किंवा श्रद्धेच्या रक्षणासाठी लढत असतात. त्यांच्या विचारांना खतपाणी घालणाऱ्या दहशतवादी संघटनांचे ते सदस्य असतात. आधुनिक काळातील दहशतवाद हा प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा आहे. आताच्या घडीला जगातील अनेक देशांमध्ये दहशतवादी संघटना हिंसक कारवाया करत आहेत.

**आंतरराष्ट्रीय पातळीवरील दहशतवादी हल्ल्यांची काही उदाहरणे पुढीलप्रमाणे:**

१. अमेरिकेमध्ये न्यूयॉर्क येथील वर्ल्ड ट्रेड सेंटरच्या टॉवर्सवर ११ सप्टेंबर २००१ रोजी दहशतवाद्यांनी विमाने धडकवून या इमारती उद्ध्वस्त केल्या. याच दिवशी राजधानी वॉशिंग्टनसह इतर ठिकाणीही दहशतवाद्यांनी हल्ले केले. हे हल्ले '९/११ चे हल्ले' म्हणून ओळखले जातात.

२. इंडोनेशियातील बाली बेटांवर २००५ मध्ये दहशतवाद्यांनी एका पाठोपाठ एक बॉम्बस्फोटांची मालिका घडवली. दक्षिण बालीतील जिंब्रान आणि कुटा या पर्यटकांसाठी प्रसिद्ध असलेल्या चौपाट्यांवर हे स्फोट घडवण्यात आले.

३. २०१५ मध्ये फ्रान्सची राजधानी पॅरिसमध्ये फुटबॉलचा सामना सुरू असताना आत्मघातकी

हल्ला झाला. पाठोपाठ पॅरिस शहर आणि उपनगरातही काही ठिकाणी गोळीबार आणि आत्मघातकी हल्ल्यांच्या घटना घडल्या.

४.२०१७ मध्ये युनायटेड किंग्डममधल्या (ब्रिटन) लंडन ब्रिजवर एका भरधाव वाहनाने रस्ता सोडून पादचाऱ्यांना चिरडले. वाहन एके ठिकाणी धडकून थांबल्यानंतर हल्लेखोराने जवळच्याच बाजारपेठेत घुसून अनेकांवर सुऱ्याने वार केले.



गडचिरोलीतील भूसुरुंगाचा स्फोट : १ मे २०१९



पुलवामातील दहशतवादी हल्ला : १४ फेब्रुवारी २०१९

**भारतातील दहशतवादी हल्ल्यांची काही उदाहरणे:**

**१. संसदेवर हल्ला :** २६ डिसेंबर २००१ रोजी नवी दिल्लीतील संसदभवन परिसरात पाच सशस्त्र अतिरेकी घुसले. हल्लेखोर लष्कर-ए- तैयबा आणि जैश-ए-महंमदचे सदस्य होते.

**२. मुंबईवर हल्ला :** २६ नोव्हेंबर २००८ रोजी पाकिस्तानातून समुद्रमार्गे आलेले काही सशस्त्र दहशतवादी मुंबईत घुसले आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, कामा हॉस्पिटल, लिओपोल्ड कॅफे, ताज हॉटेल, ओबेरॉय ट्रायडेन्ट हॉटेल, नरिमन हाऊस अशा विविध ठिकाणी हल्ले केले. हे सर्व पाकिस्तानातील लष्कर-ए-तैयबा या दहशतवादी संघटनेचे सदस्य होते.

**३. उरी लष्करी तळावर हल्ला :** १८ सप्टेंबर २०१६ रोजी पहाटे काश्मीरमधील उरी येथील लष्करी तळावर जैश-ए-महंमदच्या दहशतवाद्यांनी हल्ला केला.

**४. पुलवामा हल्ला :** १४ फेब्रुवारी २०१९ रोजी केंद्रीय राखीव पोलिस दलाचा ताफा जम्मू-श्रीनगर महामार्गाने जात असताना त्यावर मोठ्या प्रमाणात स्फोटके लावलेली मोटार धडकवण्यात आली. या हल्ल्याची जबाबदारी पाकिस्तानातील जैश-ए-महंमदने स्वीकारली.

**५. गडचिरोलीतील नक्षली हल्ला :** १ मे २०१९ रोजी महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यात भूसुरुंगाच्या स्फोटात पंधरापेक्षा जास्त जवान हुतात्मा झाले. हा स्फोट नक्षलवादी संघटनांनी घडवून आणला.

**आपण साधारणपणे पाच प्रकारांत दहशतवादाची विभागणी करू शकतो.**

**(अ) स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती किंवा एखाद्या देशापासून फुटून निघण्याच्या उद्देशाने केला जाणारा दहशतवाद :** स्वतःच्या स्वतंत्र राष्ट्रीय किंवा वांशिक अस्मितेतून एखाद्या देशापासून फुटून निघण्याच्या मागणीसाठी हिंसाचाराचा वापर केला जातो, तेव्हा तो या प्रकारातला दहशतवाद समजला जातो. (उदाहरणार्थ, ब्रिटिशांच्या जोखडातून उत्तर आयर्लंड स्वतंत्र करणे आणि संपूर्ण आयर्लंडच्या एकीकरणाच्या उद्देशाने 'आयरिश रिपब्लिकन आर्मी' ही दहशतवादी संघटना कार्यरत आहे. इराकमध्ये स्वतंत्र कुर्दिस्तानसाठी 'कुर्दिश वर्कर्स पार्टी (PKK)' ही दहशतवादी संघटना काम करते. श्रीलंकेत स्वतंत्र तामिळ राष्ट्राच्या मागणीसाठी हिंसक कारवाया करणारी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम (LTTE) ही दहशतवादी संघटनाच होती. भारतातही स्वतंत्र खलिस्तानच्या मागणीसाठी पंजाबमध्ये दहशतवादी कारवायांचा आगडोंब उसळला होता.

**(ब) धार्मिक दहशतवाद :** धर्माच्या अमूर्त संकल्पना व धार्मिक समजुतींचा गैरवापर करून दैवी आदेश पाळण्यासाठी लोकांची मनोभूमिका तयार करून माजवला जाणारा हिंसाचार या प्रकारात मोडतो. या प्रकारात प्रस्थापित यंत्रणेत बदल घडवून आणण्यासाठी शत्रूबद्दलच्या विशिष्ट कल्पना किंवा प्रतिमा प्रसारित केल्या जातात आणि त्याआधारे हिंसाचाराला उद्युक्त केले जाते. (उदाहरणार्थ, जपानमधील ओम शिनिरिक्यो या पंथाला जगातील अनेक देशांनी दहशतवादी संघटना म्हणून जाहीर केले. तथाकथित भ्रष्ट राजवटी उलथून त्या जागी शुद्ध इस्लामी सरकारे स्थापन करण्याच्या उद्देशाने अल कायदा ही दहशतवादी संघटना काम करते. इस्लामिक स्टेट ऑफ इराक अँड सिरिया (आयसिस) या दहशतवादी संघटनेचा उद्देश इस्लामी कायद्यांची कठोर अंमलबजावणी करणारी खिलाफत स्थापन करणे हे होते.)

**(क) कडव्या डाव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद :** भांडवलशाही समूळ नष्ट करून त्या जागी साम्यवादी सत्ता स्थापन करण्याच्या उद्देशाने हिंसेचे समर्थन व अवलंब करणाऱ्या दहशतवादी संघटना या प्रकारात येतात. उदाहरणार्थ, रेड आर्मी फॅक्शन हा भूतपूर्व पश्चिम जर्मनीतील कडव्या डाव्या विचारसरणीचा हिंसक दहशतवादी गट होता. भारतातील नक्षलवाद किंवा माओवादाचे उदाहरणही यासंदर्भात देता येईल.

**(ड) कट्टर उजव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद :** उदारमतवादी लोकशाहीवादी सरकारांच्या विरोधात कट्टर उजव्या विचारसरणीच्या संघटनांकडून केला जाणारा हिंसाचार व दहशतवाद या प्रकारात मोडतो. (उदाहरणार्थ, जर्मनीतील निओनात्झी संघटना किंवा अमेरिकेतील क्लू क्लक्स क्लॅन संघटनेने केलेला हिंसाचार.)

**(ई) राज्यसंस्था पुरस्कृत दहशतवाद :** या प्रकारात एखादा देश किंवा राज्यसंस्था तिची उद्‌दिष्टे साध्य करण्यासाठी स्वतःच दहशतवादी हिंसेचा मार्ग अवलंबते किंवा दहशतवादी संघटनांना आश्रय, प्रशिक्षण व शस्त्रास्त्रे आदींची मदत करून विरोधी देश किंवा संघटनांविरुद्ध त्यांचा उपयोग करते. (उदाहरणार्थ, भारताच्या पठाणकोट हवाईतळ (२०१६), उरी (२०१६) आणि पुलवामा (२०१९) येथील दहशतवादी हल्ल्यांमागे पाकिस्तानने उभी केलेली जैश-ए-महंमद ही संघटना आहे.)

### दहशतवादाचा सामना कसा करता येतो ?

**(i) संघर्ष व्यवस्थापन आणि समस्या निवारण:** दहशतवादाचा सामना करण्यासाठी भारताने त्रिस्तरीय दृष्टिकोन विकसित केला आहे. पहिली गोष्ट म्हणजे दहशतवादी हिंसेचे प्रमाण कमी करणे

आणि त्यापासून असलेला धोका विशिष्ट क्षेत्रापुरता मर्यादित करणे. याला संघर्ष व्यवस्थापन असेही म्हणतात. दहशतवादी त्यांच्या उद्दिष्टांसाठी हिंसाचार घडवत असल्याने तो निपटून काढण्यासाठी राज्यसंस्थेने बळाचा वापर करणे अपरिहार्य ठरते. पोलिस, निमलष्करी दले किंवा सैन्याचा वापर त्यासाठी केला जातो. दुसरी गोष्ट म्हणजे दहशतवादी हिंसेने ग्रस्त प्रदेशात विविध प्रकारच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या योजना सुरू करणे. तिसरी बाब म्हणजे लोकशाही यंत्रणेत सर्व घटकांना योग्य राजकीय प्रतिनिधित्व मिळण्याची खातरजमा करणे. यातल्या दुसऱ्या आणि तिसऱ्या बाबीचा समावेश सुशासनामध्ये होतो. स्थानिक जनता दहशतवाद्यांना आणि त्यांच्या हिंसक कारवायांना थारा देणार नाहीत, यासाठी सुशासन आवश्यक आहे; तर पहिल्या बाबीत यश मिळण्यासाठी आधुनिक शस्त्रास्त्रे आणि इतर साधनांच्या उपयोगातून दहशतवादी गटांवर आघात करणे आवश्यक ठरते.

(ii) **दहशतवादाविरोधात आंतरराष्ट्रीय आघाडी उभी करणे :** संयुक्त राष्ट्राच्या आमसभेने २००६ मध्ये दहशतवादविरोधी लढ्याची जागतिक व्यूहनीती (ग्लोबल काऊंटर टेररिझम स्ट्रॅटेजी) स्वीकृत केली. त्याचे चार प्रमुख भाग आहेत. ते असे :

(अ) मानवी हक्कांचे उल्लंघन होणार नाही, वांशिक, राष्ट्रीय वा धार्मिक आधारावर भेदभाव होणार नाही, कोणताही समुदाय राजकीय प्रक्रियेच्या बाहेर राहणार नाही किंवा सामाजिक-आर्थिक दृष्ट्या परिघावर राहणार नाही, याबाबतची दक्षता सर्व देशांनी घ्यावी.

(ब) दहशतवाद रोखण्यासाठी आणि त्याचा सामना करण्यासाठी विविध देशांनी परस्परांना सहकार्य करावे.

(क) दहशतवादविरोधी लढ्यात संयुक्त राष्ट्राच्या भूमिकेला पाठबळ द्यावे

(ड) मानवी हक्कांबद्दल आदर बाळगावा.

(iii) **दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई करणे:** अनेकविध प्रयत्नांनंतरही दहशतवादाची समस्या कायम राहत असेल, तर दहशतवाद्यांच्या जाळ्यांवर आणि त्यांच्या ठिकाणांवर कारवाई करणे अत्यावश्यक ठरते.

(iv) **वैचारिक लढाई :** दहशतवादी संघटना अनेक वेळा विशिष्ट राजकीय वा धार्मिक विचारसरणीसाठी लढत असतात. त्यांची ज्या विचारांवर श्रद्धा आहे, त्यांच्या रक्षणासाठी ते लढत असतात. ही गोष्ट लक्षात घेऊन दहशतवादी विचारांचा वैचारिक पातळीवरही सामना करणे अत्यावश्यक आहे.

## जम्मू आणि काश्मीर

जम्मू आणि काश्मीर राज्याचे ऑगस्ट २०१९ पूर्वी तीन ठळक विभाग होते. लडाख, काश्मीर आणि जम्मू. या राज्याच्या सीमा पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि चीनला लागून असल्याने भारताच्या दृष्टीने त्याचे सामरिक महत्त्व खूप आहे.

ब्रिटिशांनी भारत सोडताना भारतीय स्वातंत्र्याचा कायदा (इंडिया इंडिपेन्डन्स ॲक्ट) संमत केला. त्यानुसार भारत आणि पाकिस्तान अशी फाळणी झाली आणि कोणत्या देशात सामील व्हायचे किंवा स्वतंत्र रहायचे, याचे अधिकार संस्थानिकांना देण्यात आले. जम्मू-काश्मीर पाकिस्तानमध्ये सामील करावे, यासाठी महाराजा हरिसिंहांवर दबाव आणण्याचे प्रयत्न पाकिस्तानने केले. त्यासाठी ऑक्टोबर १९४७ मध्ये पठाणी टोळीवाल्यांनी जम्मू-काश्मीरवर आक्रमण केले. त्यात पाकिस्तानी सैनिकांचाही सहभाग होता. अशा परिस्थितीत महाराजा हरिसिंहांनी भारताकडे मदतीची विनंती केली आणि जम्मू-काश्मीर संस्थानच्या भारतात विलीनीकरणाच्या करारावर स्वाक्षरी केली.

काश्मीरी जनतेचे पाकिस्तानी टोळीवाल्यांपासून रक्षण करण्यासाठी भारताने जम्मू-काश्मीरमध्ये सैन्य पाठवले. अशा रीतीने भारत आणि पाकिस्तानमध्ये काश्मीरच्या मुद्द्यावरून १९४७-४८ मध्येच पहिले

युद्ध घडले. संयुक्त राष्ट्राच्या ठरावाने युद्धविराम झाला, मात्र काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. या प्रदेशाला 'पाकव्याप्त काश्मीर (POK)' असे संबोधले जाते.

जम्मू-काश्मीर भारतापासून मिळवण्यासाठी पाकिस्तानने वेळोवेळी हिंसेचा वापर केला आहे. १९६५ मध्ये पाकिस्तानने ऑपरेशन जिब्राल्टर ही मोहीम आखली. ती उघडकीस आल्यानंतर भारत-पाकिस्तान दरम्यान दुसरे युद्ध झाले. १९६५ मध्येच पाकिस्तानच्या चिथावणीने अमानुल्ला खान याने पाकव्याप्त काश्मीरमध्ये प्लेबिसाईट फ्रंट नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेचा नॅशनल लिबरेशन फ्रंट नावाने अनधिकृत सशस्त्र विभाग आहे. या गटाने अनेक वर्षे जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया केल्या. १९७६ मध्ये प्लेबिसाईट फ्रंटचे रूपांतर जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंट (JKLF) या नव्या दहशतवादी संघटनेत करण्यात आले. JKLF ची प्रमुख मागणी होती,काश्मीरच्या स्वतंत्र राज्याची निर्मिती.

**जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी गट**

- जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंटची (JKLF) स्थापना १९७७ मध्ये युनायटेड किंग्डममध्ये (ब्रिटन) करण्यात आली.
- अफगाणिस्तानातील सोव्हिएत युनियनच्या फौजांशी लढण्यासाठी १९८० मध्ये हरकत-उल-मुजाहिदीनची स्थापना करण्यात आली. १९९३ मध्ये या संघटनेचे नाव हरकत-उल-अन्सार असे बदलण्यात आले. या दहशतवादी संघटनेच्या कारवाया प्रामुख्याने काश्मीरपुरत्याच मर्यादित होत्या. मात्र, यातूनच पुढे सन २००० मध्ये जैश-ए-महंमद ही दहशतवादी संघटना स्थापन झाली. मौलाना मसूद अजहर हा तिचा म्होरक्या आहे.
- लष्करे तैयबा या दहशतवादी संघटनेची स्थापना १९८७ मध्ये झाली. मरकझ-दवा-उल-इर्शाद (योग्य धार्मिक शिकवणीचे व प्रसाराचे केंद्र) या संघटनेची ती सशस्त्र आघाडी आहे. तिचे मुख्यालय पाकिस्तानातील लाहोरजवळील मुरिदके येथे आहे. जगभरात इस्लामी जिहादचा प्रसार करणाऱ्या सौदी अरेबियातील वहाबी इस्लामशी या संघटनेची जवळीक आहे.
- हिज्बुल मुजाहिदीन ही हरकत-उल-मुजाहिदीन, हरकत-उल-अन्सार, लष्करे तैयबा, जैश-ए-महंमद आदी दहशतवादी संघटनांनी स्थानिक काश्मिरी तरुणांची दिशाभूल (ब्रेनवॉशिंग) करून उभी केलेली दहशतवादी संघटना आहे.

जम्मू-काश्मीरमधील अंतर्गत सुरक्षेचा प्रश्न १९८० च्या दशकाच्या उत्तरार्धात उग्र होण्यास सुरुवात झाली. १९८९ मध्ये नॅशनल कॉन्फरन्स या पक्षाच्या कार्यकर्त्यांची गोळी झाडून हत्या करण्यात आली. ही काश्मीरमधली पहिली राजकीय हत्या ठरली. त्याच सुमारास जेकेएलएफने तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री मुफ्ती महंमद सईद यांची मुलगी रुबियाचे अपहरण केले. जम्मू-काश्मीरचे स्वातंत्र्य ही या दहशतवादी संघटनेची प्रमुख मागणी होती.

अफगाणिस्तानातून सोव्हिएत फौजा माघारी गेल्यानंतर तिथल्या आघाडीवरून मोकळे झालेले मुजाहिदीन जम्मू-काश्मीरमध्ये वापरण्याची योजना पाकिस्तानने आखली. त्यासाठी हिज्बुल मुजाहिदिन ही पाकिस्तानी दहशतवादी संघटना स्थापन करण्यात आली. त्यामुळे काश्मीरमधील हिंसाचाराचे स्वरूप बदलले. पाकिस्तानने जेकेएलएफचा पाठिंबा व मदत बंद केली आणि त्याऐवजी काश्मीरमध्ये मुजाहिदिन घुसवण्यास सुरुवात केली. त्यामुळे १९९०च्या दशकात काश्मीरमध्ये धार्मिक मूलतत्त्ववाद पसरवून दहशतवाद सुरू झाला. परिणामी काश्मीर खोऱ्यातील पंडितांना तेथून स्थलांतर करणे भाग पडले.

कारगिलच्या संघर्षातही पाकिस्तानने केवळ मुजाहिदिन भारतीय सैन्याबरोबर लढत असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न केला. प्रत्यक्षात पाकिस्ताननेच योजनाबद्ध पद्धतीने ही घुसखोरी केली आणि पाकिस्तानी सैन्याने मुजाहिदिनांचा आभास निर्माण करून त्याचा वापर केला, याचे ठोस पुरावे उपलब्ध आहेत.

गेल्या काही वर्षांत दहशतवादी कारवायांसाठी सुरू झालेला लहान मुलांचा वापर ही काश्मीरमधील एक चिंतेची गोष्ट आहे. सरकारकडे उपलब्ध माहितीनुसार, जम्मू-काश्मीरमधील किमान ३० शाळा दहशतवादी संघटनांनी पूर्णपणे किंवा अर्धवट उद्ध्वस्त केल्या आहेत. या मुलांचा वापर रस्त्यांवर असंतोष फैलावण्यासाठी आणि पोलिसांवर दगड फेकण्यासाठी केला जात असल्याचे निदर्शनास आले आहे.

जम्मू-काश्मीरमध्ये घातपाती कारवाया करणाऱ्या लष्कर-ए-तैयबा, हरकत-उल-मुजाहिदिन, जैश-ए-महंमद यासारख्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानने नेहमीच पाठिंबा दिला आहे व सर्व प्रकारची मदत केली आहे. उरी आणि पुलवामासारख्या दहशतवादी हल्ल्यांमागे याच संघटना होत्या. जम्मू-काश्मीरमधील दहशतवादी आणि फुटिरतावादी हिंसाचार हा सीमेपलीकडील शक्तींनी पुरस्कृत केलेला आणि पाठिंबा दिलेला हिंसाचार आहे. गेल्या अडीच दशकापेक्षा अधिक काळ जम्मू-काश्मीरला या समस्येचा सामना करावा लागत आहे.

## तुम्हांला माहीत आहे का?

**सर्जिकल स्ट्राईक** हा शब्द प्रयोग पत्रकारितेतून पुढे आला, जो प्रसारमाध्यमांनी वापरावयास सुरुवात केली. जमीन, समुद्र किंवा हवाई मार्गे शत्रूच्या ठिकाणांवर अचानक हल्ला किंवा छापा घालणे याला लष्करी दृष्ट्या लक्ष्यभेदी हल्ला म्हणतात. अशा हल्ल्यात नागरी वस्तीचे किंवा जनतेची कमीत कमी हानी होईल याची काळजी घेतली जाते. अशा हल्ल्यासाठी शासन, गुप्तचर संघटना आणि लष्कर यांच्यात समन्वय असण्याची गरज असते.

- उरीवर झालेल्या हल्ल्यानंतर भारताने २९ सप्टेंबर २०१६ रोजी पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवाद्यांविरुद्ध सर्जिकल स्ट्राईक केला.
- २६ फेब्रुवारी २०१९ रोजी पाकिस्तानमधील खैबर-पख्तून प्रांतात असलेल्या बालाकोट शहराजवळील दहशतवादी छावण्यांवर भारताने हवाई हल्ला केला.


**ऐतिहासिक उदाहरण :** १६६० साली मराठी स्वराज्यावर आक्रमण करणाऱ्या शाहिस्तेखान या मोगल सरदारावर पुणे येथील लाल महालात वास्तव्य असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी छापा घातला. या छाप्यामध्ये शाहिस्तेखानाला गंभीर इजा झाली. त्यानंतर शाहिस्तेखानाने पुण्याहून पलायन केले. पुणे शहराला किंवा रयतेला कोणतीही इजा न पोहचता हा छापा/हल्ला करून मोगलांना पुण्यातून हाकलण्याचे उद्दिष्ट साध्य झाले.

## चर्चा करा


ऑगस्ट २०१९ मध्ये भारतीय संविधानातील कलम ३७० अंतर्गत जम्मू काश्मीरला असलेला विशेष दर्जा रद्द करण्यात आला. जम्मू काश्मीर राज्याचे दोन केंद्र शासित प्रदेश म्हणून विभाजन केले गेले ते असे;

(i) जम्मू काश्मीर (विधानसभा असणार आहे.)

(ii) लडाख (विधानसभा असणार नाही.)



# भारताची पूर्वोत्तर राज्ये




भारताच्या पूर्वोत्तर किंवा ईशान्येकडील प्रदेशात आसाम, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम आणि त्रिपुरा अशा आठ राज्यांचा समावेश होतो. या प्रदेशात स्वतःची स्वतंत्र भाषा, बोली आणि सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्ये असलेले दोनशेपेक्षा अधिक वांशिक समूह आहेत. ईशान्य भारत किंवा पूर्वोत्तर राज्ये म्हणून ओळखला जाणारा हा प्रदेश भारतासाठी सामरिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा आहे. याचे कारण चीन, म्यानमार, बांग्लादेश आणि भूतान या देशांशी त्यांच्या सीमा लागून आहेत.

ईशान्य भारतात बंडखोरीची पहिली गंभीर समस्या स्वातंत्र्यानंतर लगेचच नागा जमातीच्या बंडातून उभी राहिली. केंद्र सरकारने ते नियंत्रणात आणण्यासाठी सुरुवातीला मध्य प्रदेश विशेष सशस्त्र दलाचे पथक पाठवले. त्यानंतर भारतीय लष्कर आणि राज्य सशस्त्र पोलिस दलांच्या तुकड्या नागा बंडखोरांविरुद्ध लढण्यासाठी पाठवण्यात आल्या. नागालँडमध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी १९६० च्या दशकात अनेक प्रयत्न झाले. पुढे १९७५ मध्ये केंद्र सरकार आणि नागा जमातींमध्ये शिलाँग करार होऊन नागांनी भारतीय संविधान मान्य केले. मात्र, पुढे नागा संघटनांमध्ये फूट पडली आणि त्यातून तयार झालेले अतिरेकी गट त्यानंतरही हिंसाचार करत राहिले. १९९० च्या दशकात प्रधानमंत्री पी. व्ही. नरसिंह राव यांनी नागा बंडखोरांशी संवादाचे पुन्हा प्रयत्न केले. त्यातून झालेला शांतता करार नंतरच्या सरकारांनी पुढे चालू ठेवला. भारतीय जनता पक्षाच्या सरकारने ४ ऑगस्ट २०१५ रोजी नॅशनल सोशलिस्ट कौन्सिल ऑफ नागालँड (इसाक-मुइवा) या बंडखोर गटाबरोबर शांततेसाठीचा करार केला. त्यातून नागालँडमध्ये कायमस्वरूपी शांतता प्रस्थापित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

आसाममधील प्रमुख समस्या आधी पूर्व पाकिस्तान आणि नंतर बांगलादेशातून होणाऱ्या बेकायदेशीर घुसखोरीची आहे. त्याशिवायही वेगळ्या आसामच्या किंवा स्थानिक जमातींच्या वेगळ्या राज्यासाठी मागणी करणाऱ्या काही दहशतवादी संघटना तेथे कार्यरत आहेत. युनायटेड लिबरेशन फ्रंट ऑफ आसाम (ULFA), नॅशनल डेमॉक्रॅटिक फ्रंट ऑफ बोडोलँड (साओराई ग्वारा NDFB-S), कार्बी पीपल्स लिबरेशन टायगर्स (KPLT) अशी काही नावे त्यासंदर्भात सांगता येतील.

**तुम्हांला माहीत आहे का?**

राष्ट्रीय नागरिक नोंदणी (National Register for citizens, NRC) असलेले भारतात आसाम हे एकमेव राज्य आहे. यात आसाममधील सर्व भारतीय नागरिकांची नावे, पत्ते आणि फोटो आहेत. आसाममध्ये बांगलादेशातून (पूर्वीचे पूर्व पाकिस्तान) मोठ्या प्रमाणात अवैध स्थलांतरीतांनी प्रवेश केला आहे. भारताच्या गृह मंत्रालयाने भारतीय नागरिक आणि अवैध स्थलांतरीत यांच्यात फरक करण्यासाठी १९५१ मध्ये ही राष्ट्रीय नागरिक नोंदणीचे दस्ताऐवज तयार केले. १९७१ च्या भारत-पाकिस्तान युद्धाच्या दरम्यानच्या काळात आसाममध्ये मोठ्या प्रमाणात अवैध स्थलांतरीत आले होते. त्याचा परिणाम म्हणजे, सुमारे दहा वर्षे आसाममध्ये आंदोलन झाले. १९८५ मध्ये आसाम करार झाला आणि हे आंदोलन थांबले. त्या करारानुसार राष्ट्रीय नागरिक नोंदणी नव्याने करण्याचे ठरले.

आसाम कराराने स्थलांतरित व्यक्तींचे तीन गट केले.

- आसाममध्ये १९५१-६१ दरम्यान जे परदेशी नागरिक स्थलांतरीत झाले होते त्यांना पूर्ण नागरिकत्व देण्यात येईल तसेच मतदानाचा अधिकारदेखील मिळेल.
- १९६१-७१ दरम्यानच्या स्थलांतरितांना दहा वर्षे मतदानाचा अधिकार नसेल,परंतु त्यांना नागरिकत्व दिले जाईल.
- २४ मार्च १९७१ नंतरच्या स्थलांतरितांना हद्दपार केले जाईल.

स्थलांतरितांच्या वैधतेबाबत निर्णय घेण्यासाठी आसाम करारानुसार राष्ट्रीय नागरिक नोंदणीची प्रक्रिया नव्याने करण्यात आली. त्या प्रक्रियेची सुरुवात २०१३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या निरीक्षणाखाली झाली. ३१ ऑगस्ट २०१९ रोजी ही यादी जाहीर झाली.

अरुणाचल प्रदेशात एकही बंडखोर गट किंवा दहशतवादी संघटना नाही. मात्र, नागा बंडखोरांच्या घातपाती कारवायांचा उपद्रव या राज्याला अधूनमधून होत असतो.

मणिपूरमधील बंडखोरी ही प्रामुख्याने मैतेयी, नागा, कुकी, झोमी, हमार या स्थानिक जमातींमधील आपापसांतील संघर्षाचा परिणाम आहे. काही मुस्लीम दहशतवादी संघटनाही तेथे कार्यरत आहेत. मेघालयात गारो टेकड्यांमधील बंडखोरांच्या घातपाती कारवायांना पुन्हा उठाव देण्याचा प्रयत्न काही घटकांकडून सुरू आहे.

त्रिपुरामधील समस्याही आसामप्रमाणेच पूर्व पाकिस्तानातून झालेले स्थलांतर आणि नंतर बांगलादेशातून मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बेकायदेशीर घूसखोरीची आहे. भारताची फाळणी झाली, त्यावेळी पूर्व पाकिस्तानातून त्रिपुरात मोठ्या प्रमाणावर निर्वासित आले. हे बहुसंख्येने बंगाली भाषिक होते. स्थानिक आदिवासी जमातींशी त्यांचा संघर्ष सुरू झाला. बांगलादेशाच्या निर्मितीनंतर बेकायदेशीर घुसखोरी चालूच राहिली. या सर्वांतून त्रिपुराच्या लोकसंख्येचे स्वरूप बदलले आहे. या राज्याची बांगलादेशाला लागून असलेली सीमा सच्छिद्र (पोरस) म्हणजे केव्हाही ये-जा करण्याइतकी सोपी आहे.

ईशान्य भारतातील विकास आणि सुरक्षेसंबंधीच्या विशेष गरजा लक्षात घेऊन केंद्रीय गृहमंत्रालयाने त्याच्या अंतर्गत स्वतंत्र पूर्वोत्तर राज्ये किंवा ईशान्य भारत विभाग स्थापन केला आहे. या प्रदेशाच्या विकासाचे नियोजन व कार्यवाहीसाठी याआधीच १९७२ मध्ये ईशान्य भारत परिषदेची (नॉर्थ ईस्टर्न कौन्सिल) स्थापना करण्यात आली आहे. या परिषदेने पूर्वोत्तर राज्यांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास आणि सामाजिक-आर्थिक विकासासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले आहेत.

पूर्वोत्तर राज्ये किंवा ईशान्य भारतातील बंडखोरीमागे नेहमीच भारतबाह्य शक्तींचा हात राहिला आहे. उदाहरणार्थ, नागा बंडखोर नेता फिझो १९५६ मध्ये तेव्हाच्या पूर्व पाकिस्तानात गेला आणि तेथून ब्रिटनमध्ये आश्रयाला गेला. तिथूनच त्याने नागा बंडखोरांचे नियंत्रण

व नेतृत्व केले. उल्फा या दहशतवादी संघटनेने १९८५ पासूनच बांगलादेश आणि म्यानमारमध्ये प्रशिक्षण तळ उभारले होते. या संघटनेचे म्यानमारमधील काचीन इंडिपेंडन्स आर्मी या संघटनेशी लागेबांधे होते. मणिपूरमधील युनायटेड नॅशनल लिबरेशन फ्रंट (UNLF) या दहशतवादी संघटनेने पूर्व पाकिस्तानातील सिल्हेट येथे त्यांचे समांतर सरकार (गव्हर्नमेंट इन एक्साइल) स्थापन केले होते.

चीनने पूर्वोत्तर राज्यांमधील विविध बंडखोर गटांना नेहमीच उत्तेजन आणि अप्रत्यक्ष मदत दिली आहे. मैतेयी, मिझो, काचीन आणि आसामी दहशतवादी संघटना किंवा बंडखोर गटांमधील समन्वयाचे कामही चीन करत असे. ईशान्य भारतातील बंडखोरांसाठी बांगलादेश हे तर सर्वाधिक सुरक्षित आश्रयस्थान होते. मात्र, बांगलादेशालाच त्याची झळ पोहोचू लागल्यानंतर आणि २०१३ मध्ये तेथे घातपाती कारवाया झाल्यानंतर तेथील सरकारने दहशतवादी संघटनांविरुद्ध कारवाई सुरू केली आहे.

## कडव्या डाव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद

नक्षलवादी किंवा आता माओवादी नावाने ओळखल्या जाणाऱ्या चळवळीला भूमिहीन शेतमजुरांचा पाठिंबा असल्याचे मानले जाते. भारतातील या चळवळीचा उगम १९४६ ते १९५१ दरम्यानच्या तेलंगणातील उठावात असल्याचे सांगितले जाते.

नक्षल चळवळीची खरी सुरुवात १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे जमीनदारांविरुद्ध झालेल्या उठावातून झाली. या ठिकाणाच्या नावावरूनच ही नक्षलवादी चळवळ म्हणून ओळखली जाऊ लागली. चारू मुजुमदार यांनी केलेल्या मार्क्स, लेनिन आणि माओ झे डाँग या साम्यवादी नेत्यांच्या वैचारिक मांडणीतून या चळवळीचा पाया उभा राहिला.

या चळवळीचे हिंसक स्वरूप आणि धोका लक्षात घेऊन १९७०च्या दशकात सरकारने त्याविरुद्ध कठोर कारवाई सुरू केली. मुजुमदार व अन्य नेत्यांच्या अटकेने काही काळ ही चळवळ थंडावली. परंतु, १९८० मध्ये चळवळीने पुन्हा जोर धरला आणि दहशतवादी स्वरूप धारण केले. तिथून पुढे या चळवळीला कोणताही ठोस वैचारिक पाया राहिला नाही.

**तेलंगणा आंदोलन : (१९४६–१९५१)**

तेलंगणा नावाने ओळखला जाणारा आधीच्या आंध्र प्रदेशातील भाग आता स्वतंत्र राज्य बनला आहे. स्वातंत्र्याच्या वेळी हा भाग हैद्राबाद राज्याचा भाग होता. स्वातंत्र्यानंतर हैद्राबादचे भारतात विलीनीकरण करण्यात आले. त्याच सुमारास तेलंगणातील शेतमजुरांनी एकत्र येऊन जमीनदारांविरुद्ध मोठा उठाव केला. हा उठाव तेलंगणा आंदोलन म्हणून ओळखला जातो. हे आंदोलन घडवण्यामागे साम्यवादी आणि समाजवादी पक्षांनी उभे केलेले शेतमजुरांचे संघटन होते. अन्याय करणाऱ्या जमीनदारांविरुद्ध त्यांच्यात प्रचंड असंतोष होता.

सन २००४ मध्ये नक्षलवादी चळवळीशी संबंधित कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी–लेनिनवादी) आणि इतर गट एकत्रित आले. त्यांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओईस्ट) अशी नवी संघटना स्थापन केली. तेव्हापासून या दहशतवाद्यांना माओवादी म्हटले जाते. घनदाट जंगले किंवा पर्वतराजीच्या सामरिक दृष्ट्या महत्त्वाच्या परिसरात लोकांचे मुक्तिलढे उभारणे, गनिमी युद्धतंत्राचा विकास व विस्तार करणे अशी उद्दिष्टे या चळवळीने तिच्यासमोर ठेवली.

भारतातील साधारण १७० जिल्हे नक्षलवादी हिंसेने बाधित आहेत असे मानले जाते. नेपाळपासून ते कर्नाटक, केरळपर्यंत भारताच्या मध्य भागातून जाणाऱ्या दाट जंगलाच्या आणि आदिवासी वस्तीच्या परिसरात नक्षलवाद्यांनी वर्चस्व निर्माण केले आहे. त्याला रेड कॉरिडॉर किंवा लाल पट्टा असे म्हटले जाते. त्यात बिहार, झारखंड, ओरिसा, छत्तीसगड, मध्य प्रदेश, तेलंगणा आणि आंध्र प्रदेश आणि कर्नाटक आणि महाराष्ट्रातील काही भागांचा समावेश होतो.

२००६ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंह यांनी देशाच्या सुरक्षेला असलेला सर्वांत मोठा, गंभीर व अंतर्गत धोका अशा शब्दांत नक्षलवादी

हिंसाचाराचे वर्णन केले होते. वाढत्या नक्षलवाद हिंसाचाराबद्दल बोलताना ते म्हणाले होते, "डाव्या विचारसरणीतून प्रभावित झालेला हिंसाचार हा आपल्या अंतर्गत सुरक्षेला असलेला सर्वांत मोठा धोका आहे."

माओवादी संघटनांच्या कारवाया देशातील प्रामुख्याने ग्रामीण आणि अविकसित भागात सुरू आहेत. हा प्रदेश मुख्यतः दाट जंगलाचा आणि दुर्गम डोंगराळ असा आहे. तेथे रस्ते, तसेच दळणवळणाच्या आणि आधुनिक संपर्क-संवादाच्या यंत्रणांचा अभाव आहे. त्यामुळे पोलिस आणि सुरक्षा दले या भागात प्रभावीपणे काम करू शकत नाहीत. याचा गैरफायदा घेऊन माओवादी/नक्षलवादी गटांनी प्रामुख्याने या प्रदेशांमध्ये त्यांचे वर्चस्व निर्माण केले आहे.

**माओवादी कारवायांची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील :**

(i) सरकारविरुद्ध अपप्रचार किंवा प्रचारतंत्राचा वापर करणे, तशा घोषणा तयार करणे

(ii) या घोषणांचा वापर करून सरकारविरोधात माओवादी विचारांवर आधारित आंदोलन उभे करणे किंवा प्रत्यक्ष हिंसक कृती घडवून आणणे

(iii) सर्वसामान्य लोक (मासेस) आणि बुद्धिजीवी वर्ग (क्लास) यांच्यात प्रचाराच्या यंत्रणा उभारणे

(iv) सरकार आणि प्रस्थापित यंत्रणांच्या विरोधात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन (मास मुव्हमेंट) उभे करणे

(v) महिला, आदिवासी आणि अल्पसंख्याकांना क्रांतीसाठी तयार करणे (मोबिलायझेशन)

(vi) नागरी भागातील वस्त्यांमध्ये क्रांतिकारक जनआंदोलनांना पूरक अशी मानसिकता तयार करणे

(vii) वेगवान आणि अनपेक्षित कारवायांसाठी 'आघात करा व पळून जा' यांसारखे डावपेच वापरणे

(viii) सशस्त्र क्रांतिकारी संघटनांचे वेगवेगळे नमुने (आकृतिबंध) उभे करणे

विविध देशांतील दहशतवादी संघटना त्यांच्या हिंसक कारवायांसाठी लहान मुलांचा वापर करत असल्याचे संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालात म्हटले आहे. त्यात नक्षलवादी संघटनांचाही उल्लेख आहे. नक्षलवादी संघटना परिसरातील लहान मुलांना बळजबरीने संघटनेत भरती करून त्यांची पथके (बालदस्ता) उभारतात. त्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण देतात. त्यांचा खबरे किंवा निरोपे म्हणून वापर करतात. तसेच, पायवाटा व रस्त्यांवर आधुनिक स्फोटके (इम्प्रोव्हाईज्ड एक्स्प्लोजिव्ह डिव्हायसेस - IED) पेरण्याचे कामही या मुलांमार्फत केले जाते. काही प्रसंगी पोलिस किंवा सैनिकांसमोर संरक्षक ढाल म्हणून लहान मुलांना उभे करण्याचे प्रसंगही घडले आहेत.

**डाव्या विचारसरणीतून उभा राहिलेला दहशतवाद म्हणजे काय?**

सन २००४ मध्ये तत्कालीन आंध्र प्रदेशात कार्यरत असलेला पीपल्स वॉर ग्रुप (PWG), बिहारमधील माओईस्ट कम्युनिस्ट सेंटर ऑफ इंडिया आणि इतर नक्षलवादी गट एकत्र येऊन त्यांनी कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (माओईस्ट) नावाने एकच दहशतवादी संघटना स्थापन केली. ही संघटना कडव्या डाव्या विचारसरणीवर आधारित आहे. बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा (अनलॉफुल एक्टिव्हिटीज प्रिव्हेन्शन ॲक्ट), १९६७ मधील तरतुदींनुसार ही संघटना व तिच्याशी संबंधित सर्व संस्था, नागरी भागात काम करणारे गट (फ्रंट ऑर्गनायझेशन्स) यांचा समावेश देशातील दहशतवादी संघटनांच्या यादीत करण्यात आला आहे. (लोकशाही मार्गाने सत्तेवर आलेले) सरकार उलथून टाकण्यासाठी सशस्त्र हिंसाचाराचा मार्ग अशी बंदी घातलेल्या माओवादी संघटनेची मुख्य विचारसरणी आहे.

**For details please see:**

**(1)** PM's speech at the Chief Minister's meet on Naxalism, April 13, 2006, New Delhi **See:**
https://archivepmo.nic.in/drmanmohansingh/speech-details.php?nodeid=302

(2) For legal details on Terrorism see: Counter Terrorism and Counter Radicalization Division, Ministry of Home, Government of India. The Division deals with matter relating to terrorism, counter-terrorism, radicalization, counter-radicalization, UAPA, NIA Act, FICN, FATF.

https://mha.gov.in/division_of_mha/counter-terrorism-and-counter-radicalization-division

**(2)** Chapter on Internal Security, Annual report, Ministry of Home, Government of India (Latest Report)

**https://mha.gov.in/documents/annual-reports**

OR https://mha.gov.in/sites/default/files/MINISTRY%20OF%20HOME%20AFFAIR%20AR%202017-18%20FOR%20WEB.pdf

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

**(i)** सुरक्षा या संकल्पनेचा पारंपरिक अर्थ .................. यावर केंद्रित होतो.

(अ) राज्य

(ब) लोक

(क) लष्कर

(ड) शासन

**(ii)** नक्षलवाद म्हणून संबोधल्या गेलेल्या डाव्या विचारसरणीचा उगम ......... मध्ये झाला.

(अ) तेलंगणा चळवळ

(ब) बोल्शेविक क्रांती

(क) चीन येथील कम्युनिस्ट क्रांती

(ड) क्युबा येथील क्रांती

**(ब) योग्य कारण देऊन वाक्य पूर्ण करा.**

(i) आसाममधील अंतर्गत सुरक्षिततेची समस्या ही त्या ठिकाणाहून होणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरामुळे निर्माण झाली.

**(क) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) IRA, LTTE, ETA, OPEC

**प्र. २ संकल्पना चित्र पूर्ण करा.**

भारताच्या पूर्वोत्तर भागात असलेली राज्ये खालीलप्रमाणे..

| | | | |
|---|---|---|---|
| आसाम | | | |
| | | | |

**प्र. ३ खालील विधान चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) नक्षलवादाची सुरुवात ही १९६७ मध्ये पश्चिम बंगालमधील नक्षलबारी येथे सरंजामशाही विरुद्धच्या लढ्याने झाली.

**प्र. ४ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) प्लेबिसाईट फ्रंट आणि जम्मू काश्मीर लिबरेशन फ्रंट.

**प्र. ५ खालील चित्र बघून त्यावर आपले विचार लिहा.**



**प्रश्न ६ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) भारताचा दहशतवादविरोधी दृष्टिकोन काय आहे ते स्पष्ट करा.

**प्रश्न ७ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सविस्तर उत्तर लिहा.**

(i) सर्वसमावेशक सुरक्षा म्हणजे काय ?

(अ) पर्यावरण सुरक्षा (ब) आर्थिक सुरक्षा

(क) सामाजिक सुरक्षा (ड) राजकीय सुरक्षा

**उपक्रम**

ईशान्य भारताचा नकाशा बघा. तेथील कोणतेही एक राज्य निवडा आणि त्याच्या सुरक्षाविषयक समस्यांचा अभ्यास करा. त्यावर टिपण लिहून वर्गात चर्चा करा.